# प्रकरण - पाचवे

---

# उपसंहार

# प्रकरण - पाचवे
# उपसंहार

**प्रस्तावना :**

पंढरपूर हे महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण आहे. सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्राच्या आग्नेय भागात असून पंढरपूर तालुका सोलापूर जिल्ह्याच्या पश्चिमेस आहे. अशा या पंढरपूर नगरपालिकेची स्थापना ब्रिटिश राजवटीत १२ ऑक्टोबर १८५५ मध्ये झाली. पंढरपूर नगरपालिकेची इमारत नवीपेठ येथे आहे. सध्या पंढरपूर नगरपालिका 'ब' वर्गात येते. पंढरपूर नगरपालिकेचे क्षेत्रफळ १९९९ साली १२.०८ चौ.कि.मी. एवढे होते. परंतु पंढरपूर नगरपालिकेमध्ये 'इसबावी व टाकळी'चा काही भाग नव्याने समाविष्ट केल्याने पंढरपूर नगरपालिकेचे सध्याचे क्षेत्रफळ १७.२८ चौ.कि.मी. एवढे झाले आहे. ब्रिटिश काळी पंढरपूर शहराची लोकसंख्या इ.स. १८९१ मध्ये २७९८० इतकी होती. तर २००१ च्या जनगणनेनुसार पंढरपूर शहराची लोकसंख्या ९१३८१ इतकी आहे. पंढरपूर नगरपालिकेमध्ये ११ प्रभाग आहेत. तर पंढरपूर नगरपालिकेमध्ये नगरसेवकांची संख्या ३३ आहे. त्यापैकी ११ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या जातात. पंढरपूर शहरापासून २ कि.मी. अंतरावर रेल्वे स्थानक आहे. पंढरपूर शहरामध्ये एक मोठे असे बसस्थानक आहे. बस स्थानकाजवळच पोलीस स्टेशन आहे. पंढरपूर शहरामध्ये जिल्हा सत्र न्यायालय, दिवाणी व फौजदारी न्यायालय आहे.

पंढरपूर शहराला श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरामुळे विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्रातील 'दक्षिणकाशी' व 'संतांचे माहेरघर' म्हणून या तीर्थक्षेत्राला ओळखले जाते. पंढरपूरला सुमारे ८०० ते ९०० वर्षांची परंपरा व इतिहास आहे.

विठ्ठलाच्या दर्शनासाठी दरवर्षी एक कोटी पेक्षा जास्त भाविक पंढरपूरला येत असतात. पंढरपूर नगरपालिकेने पंढरपूर शहराच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. ''झाडू संतांचे मार्ग, करू पंढरीचा स्वर्ग'' हे नगरपालिकेचे असलेले ब्रिद वाक्य खरे करण्यासाठी नगरपालिकेकडून जनतेला मुलभूत सोयी-सुविधा पुरविल्या जातात. नगरपालिकेने सर्व दृष्टीकोनातून कामे केलेली आहेत. त्यामध्ये स्वच्छता, सामाजिक प्रश्न, शैक्षणिक विकास, रस्ते निर्मिती, आरोग्याच्या सोयी अशी अनेक कामे केली आहेत. पंढरपूर नगरपालिकेने नागरिकांना योग्यरित्या पाणीपुरवठा करण्यासाठी शहरातील विविध भागात पाण्याच्या उंच टाक्या बांधल्या आहेत. पंढरपूर शहरात नगरपालिकेने संपूर्ण शहरात पाईपलाईन टाकून शहरात अंदाजे ५६ कि.मी. पाईपलाईनचे जाळे पसरविण्यात आले आहे. पंढरपूर शहरामध्ये मनिषानगर येथे जलशुद्धीकरण केंद आहे. तसेच गोपाळपूर येथे मलशुद्धीकरण केंद्र बांधण्यात आले आहे. पंढरपूर शहरामध्ये नगरपालिकेमार्फत घरगुती ड्रेनेज जोडणीचे काम करण्यात आले आहे. पंढरपूर शहरातील काही भागात बंदिस्त गटारे आहेत.

पंढरपूर नगरपालिकेच्या मालकीची जिजामाता व पद्मावती ही दोन उद्याने आहेत. या उद्यानामध्ये विविध प्रकारची खेळणी, फुलझाडे, रोपे, आकर्षक लॉन, रेल्वे गाडी इ. प्रकारची खेळणी आहेत. पंढरपूर शहरामध्ये विविध ठिकाणी वृक्षारोपण केले आहे. शहरातील उपनगरात नगरपालिकेच्या खुल्या जागेत वृक्ष लागवड केली आहे. नगरपालिकेची अग्निशमन यंत्रणा पाणीपुरवठा विभागा अंतर्गत कार्यरत असते. पंढरपूरमध्ये दरवर्षी आषाढी, कार्तिकी, चैत्री व माघी अशा चार मोठ्या यात्रा भरतात. या यात्रेला लाखाहून अधिक भाविक पंढरपूरला येत असतात. भाविकांच्या सोयीसाठी पंढरपूर नगरपालिकेने विविध ठिकाणी सार्वजनिक

शौचालये व मुताऱ्या बांधण्यात आलेल्या आहेत. शहरातील सर्व सांडपाणी गोपाळपूर येथील लेंडकी नाल्यात सोडून त्यापासून कंपोस्ट खत बनविले जाते. पंढरपूर शहरात नगरपालिकेने दिवाबत्तीची सोय केली आहे. पंढरपूर शहरात सर्वत्र रस्त्यांचे डांबरीकरण केले आहे. प्रत्येक गल्लीतील रस्त्यांची बांधणी केली आहे

पंढरपूर नगरपालिकेने नागरिकांच्या आरोग्य व स्वच्छता याबाबत महत्त्वाची महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. पंढरपूर नगरपालिकेने आरोग्याच्या दृष्टीने जनतेला योग्य त्या सुविधा पुरविलेल्या आहेत. नगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरातील सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य सुस्थितीत राखण्याचे काम केले जाते. हिवताप, डेंग्यू, मलेरिया यासारख्या रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी पाण्याची डबकी व पाणथळ जागेवर डास उत्पत्ती प्रतिबंधक फवारणी केली जाते. कुटुंब कल्याण कार्यक्रम व कुटुंब नियोजन केंद्र या विभागाकडून नागरिकांना सल्ला व औषधोपचार मोफत केला जातो. आरोग्य विभागाचे सफाई कर्मचारी शहरातील साफ-सफाई व स्वच्छता करण्याचे काम करतात.

पंढरपूर शहरामध्ये नगरपालिका मालकीची 'नगरवाचन मंदिर' व जिजामाता उद्यानाजवळ एक वाचनालय अशी दोन वाचनालये आहेत. शहरात विविध ठिकाणी खेळाची मैदाने आहेत. क्रिकेटच्या खेळासाठी रेल्वे मैदान व अंबाबाई पटांगण ही दोन क्रीडांगणे आहेत. पंढरपूर नगरपालिकेने प्राथमिक, माध्यमिक व औद्योगिक प्रशिक्षण संस्था इ. सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. पंढरपूर शहरात नगरपालिकेच्या शाळेव्यतिरिक्त विवेक वर्धिनी, द. ह. कवठेकर, कवठेकर कन्या प्रशाला, यशवंत विद्यालय, गौतम विद्यालय, उमा महाविद्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, इंजिनिअरींग कॉलेज इ. शैक्षणिक संस्था

आहेत. पंढरपूर नगरपालिकेने सामान्य प्रशासन व वसूलीचा खर्च, सार्वजनिक सुरक्षितता, आरोग्याच्या सोयी, शिक्षण व इतर कामांवर खर्च केलेला दिसून येतो. पंढरपूर नगरपालिकेने यात्राकाळातही भाविकांना अनेक सोयी पुरविलेल्या आहेत. नगरपालिकेने यात्राकाळात पाणीपुरवठा, शहराची स्वच्छता व साफसफाई, आरोग्य या गोष्टीकडे प्रामुख्याने लक्ष दिलेले दिसून येते.

पंढरपूर नगरपालिकेने अनेक विकास कामे केलेली असली तरीही या कामात काही त्रुटी आढळून येतात. पंढरपूर शहरातील काही वार्डात कमी-अधिक प्रमाणात सुधारणा केल्याचे दिसून येते. यात्राकाळातही नगरपालिका पाहिजे त्या प्रमाणात भाविकांना सुविधा देण्यात अपयशी ठरली आहे. यात्रेसाठी शासनाकडून अनुदान मिळत असूनही नगरपालिका मात्र भाविकांना सुविधा उपलब्ध करून देण्यात अपयशी ठरत आहे.

**शोध प्रबंधाची प्रकरण योजना :**

प्रस्तूत संशोधनाची मांडणी चार प्रकरणात करण्यात आलेली आहे.

१) पंढरपूर नगरपालिकेचा ऐतिहासिक आढावा

२) पंढरपूर नगरपालिकेचे प्रशासन

३) पंढरपूर नगरपालिकेने केलेली विविध विकासकामे

   अ) सामाजिक कामे

   ब) आरोग्य विषयक कामे

   क) शैक्षणिक कामे

   ड) आर्थिक कामे

४) मूल्यमापन

**संशोधनातील प्रकरणांचा सारांश :**

प्रकरण योजनेचा सारांशरूपाने थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे -

**प्रकरण पहिले :**

**पंढरपूर नगरपालिकेचा ऐतिहासिक आढावा**

प्रस्तूत प्रकरणामध्ये पंढरपूर नगरपालिकेचा ऐतिहासिक आढावा भारतातील, स्थानिक संस्थांचा इतिहास, पंढरपूरची व्युत्पत्ती, पंढरपूर शहराचे भौगोलिक स्थान, प्राचीनकालीन पंढरपूर, मध्ययुगीन पंढरपूर, पंढरपूर नगरपालिकेची स्थापना, पंढरपूर नगरपालिकेचा विकास इ. बाबींचा सविस्तर अभ्यास करण्यात आलेला आहे.

**प्रकरण दुसरे :**

**पंढरपूर नगरपालिकेचे प्रशासन**

प्रस्तूत प्रकरणामध्ये नगरपालिका प्रशासनाचे स्वरूप, पंढरपूर नगरपालिकेची रचना, पंढरपूरचे आजपर्यंतचे नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष, नगरपालिका सभा, नगरपालिकेचे आजपर्यंतचे प्रशासकीय अधिकारी, समकक्ष अधिकारी वर्ग, पंढरपूर नगरपालिकेच्या विविध समित्या व त्यांचे सभापती, नगरपालिकेच्या उत्पनांची साधने, राज्यशासनाचे नगरपालिकेवरील नियंत्रण व देखरेख इ. विविध बाबींचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे.

**प्रकरण तिसरे :**

**पंढरपूर नगरपालिकेने केलेली विविध विकासकामे**

प्रस्तूत प्रकरणामध्ये नगरपालिकेने केलेली विविध कार्ये त्यामध्ये -

अ) सामाजिक कार्ये - सामाजिक कार्यामध्ये पाणीपुरवठा, भुयारी गटारी योजना, उद्याने, फायर ब्रिगेड, एस.टी. बसस्थानक व पोलीस स्टेशन, करमणूकीची साधने,

विविध धार्मिक मठ, अनुसूचित जाती-जमातीसाठी नगरपालिकेने केलेल्या सुधारणा सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या, दिवाबत्ती सोय, सार्वजनिक रस्ते बांधणी व दुरूस्ती, सार्वजनिक वाचनालये, सार्वजनिक क्रिडांगणे, भंगी मुक्ती योजना, शॉपिंग सेंटर, भाजी मंडई, कत्तलखाने, स्वस्त धान्य दुकान योजना, स्मशानभूमी इ. लोकोपयोगी बाबींचा विस्तृत अभ्यास करण्यात आलेला आहे.

ब) आरोग्य विषयक कार्य - आरोग्यविषयक कार्यामध्ये कुटुंब कल्याण कार्यक्रम, कॉलरा, घटसर्प, विषमज्वर व धनुर्वात, आयुर्वेदीक दवाखाना, प्रसूतीगृह व बालसंगोपन, हिवताप निर्मूलन योजना, मलेरिया व डेंग्यू निर्मूलन योजना, कुटुंब नियोजन केंद्र इ. बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे.

क) शैक्षणिक कार्य - शैक्षणिक कार्यामध्ये प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च-माध्यमिक शिक्षण, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व विविध शिक्षणसंस्था इ. बाबींचा सखोल व सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे.

ड) विविध आर्थिक कामे व यात्राकाळातील नगरपालिकेचे योगदान इ. बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे.

**प्रकरण चौथे :**

**मूल्यमापन**

प्रस्तूत प्रकरणामध्ये पंढरपूर नगरपालिकेच्या स्थापने पासून २००७ पर्यंतच्या विविध विकास योजनांचा आढावा घेतलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने पंढरपूर शहरातील सामाजिक समस्या, पर्यावरण विषयक समस्या व आर्थिक समस्या, प्रशासकीय समस्या व वरील सर्व समस्यांवर उपाय सुचविलेले आहेत. इत्यादी बाबींचा सविस्तर आढावा घेतलेला आहे.